# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे**

**फोन.नं. ०२२-२९४५१००१**

**Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र ९४** **दिनांक- १३/०४/२०२१**

## "कोवीड-१९" आजाराची (आरटीपीसीआर) टेस्टची खोटी सर्टिफीकेटै तयार करुन परराज्यात प्रवास करणाऱ्यांना, गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा यांचेकडून अटक.

दिनांक १२/०४/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, महाराष्ट्र राज्यामध्ये लॉकडाऊन सुरु होण्याची शक्यता धरुन काही लोक ट्रॅव्हल्सने गुजरात राज्यात जात आहेत. गुजरात राज्यामध्ये प्रवेश करतेवेळी कोवीड-१९ या आजाराची चाचणी करुन निगेटिव्ह सर्टिफिकेट असल्यासच प्रवेश दिला जातो करीता ट्रॅव्हल्स मधुन ट्रॅव्हल्सचे मालक व चालक असे कोणत्याही प्रकारे कोवीड-१९ आजाराची टेस्ट नकरता खोटी सर्टीफिकेट देवुन मुंबई ते गुजराथ असा प्रवाशांना घेवुन प्रवास करीत आहेत. अशी बातमी मिळाल्याने सदर बातमी पोलीस निरीक्षक श्री अविराज कुराडे यांनी वरीष्ठांना माहीती कळवुन सदर बातमीच्या अनुशंगाने कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश प्राप्त केले.

दिनांक १३.०४.२०२१ रोजी पहाटे ०१.०० वाजण्याचे सुमारास यातील पवन ट्रॅव्हल्सची बस क्रमांक **जीजे/१४/झेड/४५९०** चालक आरोपी नामे १) दिपसिंग नवलसिंग चौहान वय-३५वषे, धंदा.ड्रायव्हर, रा. ए/१७ व्दारकापुरी सोसायटी, आशापुरा मंदीर जवळ, घाटलोंडी अहमदाबाद, गुजरात २) देवीसिंग दलपतसिंग चावडा, वय-३५ वर्षे धंदा ड्रायव्हर, रा. मोहन नगर विभाग, जिवाभाई जेठाभाईची चाळ, नारायण अहमदाबाद, गुजरात ३) जितेंद्रसिंग हमीरसिंग चौहान वय-२९वर्षे, धंदा क्लिनर, रा. जिवाभाईची चाळ रुम नं. ७ बरवाडेबास, वस्त्रापुर, अहमदाबाद, गुजरात व पाहीजे आरोपीत ४) पवन ट्रॅव्हल्सचे मालक हितेशभाई, ५) निता ट्रॅव्हल्सचे मॅनेजर संदीप, व कर्मचारी ६) जिग्नेश पटेल यांनी आपसात संगनमत करुन त्यांचे ताब्यातील बस क्रमांक **जीजे/१४/झेड/४५९०** मध्ये कोणत्याही प्रकारे सोशल डिस्टेनसिंगचे पालन न करता, प्रवाशी बसवुन त्यातील १९ प्रवाशी व १ चालक व १ क्लिनरची अशी एकुण २१ कोवीड-१९ आजाराची टेस्ट न करता बनावट निगेटीव्ह आरटीपीसीआर टेस्टचे सर्टीफिकेट बनवुन तसेच उर्वरीत १२ प्रवाशांकडुन देखील आरटीपीसीआर टेस्टचे नावावर तिकीटा पेक्षा ३०० रुपये जादा रक्कम आकारुन सर्टिफिकेट न घेता, तसेच सदर प्रवास करतेवेळी कोवीड-१९ चा प्रसार होवु नये म्हणुन शासनाने केलेल्या नियमांच उल्लंघन करतांना मिळुन आले.

सदर कारवाईत एकुण ३३ इसमांवर काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. I ३१९/२०२१ भा.द.वि.स कलम ४६५,४६८,४७१,२६९,२७०,१८८,३४ आपत्ती व्यवस्थापन २००५ चे कलम ५१(२),सह कोविड १९ उपाय योजना २०२० नियम ११ प्रमाणे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ कलम २,३,४, प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा.श्री. डॉ.महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, पोलीस निरीक्षक श्री संपतराव पाटील, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, पो.हवा./३६ संदीप शिंदे, पोहवा/२२१७ किशोर वाडिले, पोहवा/१८५० संजय शिंदे, पोना/३०८ पुष्पेंद्र थापा, नेम. गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ व पो.हवा./१९८७ विजय डेमरे, पो.हवा./२२९८ विजय निलंगे, पो.शि./३६६० केशव शिंदे, मपोना/२५४५ कमल चव्हाण, म.पो.शि./३२०६ सपना थोरात सर्व नेम. अ.मा.वा.प्रती.कक्ष भाईंदर यांनी केली असून गुन्हयांचा पुढील तपास काशिमीरा पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

Scanned with CamScanner